# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ०५/०७/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिति सभागृहात खालील विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर

दिनांकः— ०२/०७/२०१९

आदेशान्वये,

(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

वि.क्र.108ः—
{स्लम विभाग}

प्रभाग क्र. 19 (ड) संजीवनी हॉस्पीटल पासुन साईबाबा बेकरी पर्यन्त टांगा स्टॅण्ड, ईतवारी येथे नाल्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रू. ७३,३०,७८४/— (त्रेहात्तर लक्ष, तिस हजार, सातशे चौऱ्यांशी फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

या कामाचा खर्च आकस्मिक निधी पद क्र. A28801332203 (665) अंतर्गत करण्यात येईल.

टिप :

1. बांधकामाचा खर्च आकस्मिक निधी पद क्र. A28801332203 (665) अंतर्गत करण्यात येईल.
2. या कामाचे रू. 73,30,784/— रकमेचे प्राकलनास मुख्य अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.109ः—
{आरोग्य विभाग}

नागपूर मनपा अंतर्गत एकुण १० झोन मध्ये प्रभाग निहाय स्वच्छ कर्मचा—यांना प्रोत्साहानात्मक बाबी करणे विषयी स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत असलेल्या निर्देशानुसार नागपूर महानगरपालिका परीसरात काम करणारा स्वच्छता कर्मचारी किंवा ऐवजदार यांना प्रोत्साहन मिळावे याकरीता ''स्वच्छ व स्मार्ट बिट'' योजना राबविण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून कर्मचारी ज्या परीसरात सफाईचे काम करतो त्यास बिट असे संबोधण्यात येते. तसेच एका कर्मचा—यास एका बिटची जबाबदारी देण्यात आली असून, प्रत्येक झोन मधून प्रभाग निहाय दर महिन्यात एक स्वच्छ व स्मार्ट बिट निवडून त्या कर्मचा—यास (स्थायी व अस्थायी) प्रोत्साहन भत्ता स्वरुपात रु. १०००/— देण्याचे प्रस्तावित आहे.

याकरीता झोन स्तरावर निवड समिती तयार करुन खालील निकषाचे आधारे दर महिन्याच्या २ तारीख पर्यंत ''स्वच्छ व स्मार्ट बिट'' व बिट कर्मचा—यांचे नाव कार्यालयास सादर करुन रु. १०००/— व शाल, श्रीफळ आणि प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहीत करणे.

१) नियमित प्रामाणिक व पूर्ण वेळ काम करणारे.
२) व्यसनाधीन नसावा, नागरीक लोकप्रतिनिधीची सौहार्दपूर्ण वर्तणूक.
३) संपूर्ण बिट स्वच्छ स्मार्ट असावा.
४) गणवेश, हात मोजे, वैयक्तीक साफ सफाई इत्यादी सह त्या बिट मध्ये

ओला/सुखा कच—याबाबत प्रचार
५) बिट मधील दर्शनिय भागात कर्मचा—याचे नाव, मोबाईल नंबर, जमादाराचे नाव असणे बंधनकारक राहील.
६) बिट अंतर्गत स्वच्छता गृह/टॉयलेट/कचरा कन्टेनर याबाबतची माहिती बिट प्रमुखाकडे अराणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबींवर उत्कृष्ट बिट नेमण्याचे प्रस्तावित आहे.

नागपूर मनपा अंतर्गत एकुण ३८ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातील उत्कृष्ट बिट कर्मचा—यास रु. १०००/— व शाल, श्रीफळ वरील खर्च रु. २५०/— यानुसार रु. ४७५००/— प्रति माह प्रमाणे वार्षिक खर्च रु. ५,७०,०००/— अपेक्षित आहे.

वरील योजना पुढील ५ वर्ष राबविण्याचे प्रस्तावित असून यावर येणारा खर्च अंदाजे रु. ३० लाख अपेक्षित राहील. व हा खर्च स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पद क्रं. A24001220302 या पदामधून अथवा शासनाकडून प्राप्त निधी SBM या अंतर्गत भागविण्यात येईल.

यास्तव ''स्वच्छ व स्मार्ट बिट'' योजना व प्रभाग निहाय प्रती बिट प्रमुख कर्मचा—यास (स्थायी व अस्थायी) यांना रु. १०००/— व शाल, श्रीफळ पारीतोषिक म्हणुन देण्याचा प्रश्न विचारात घेणे.
सलंग्न— सविस्तर माहिती नस्तीत सादर आहे.

वि.क्र.110:— {हॉट मिक्स प्लॅन्ट} हॉट मिक्स प्लॅन्ट विभागीय कामाच्या अनुषंगाने नविन 80 TPH बॅचमिक्स प्लॅन्ट खरेदी उभारणी व इतर पुरक मशिनरी पुरवठा करणे याकरिता प्रथम टप्प्यासाठी रू. 6.62 कोटी खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| अ) 80 TPH बॅचमिक्स प्लॅन्ट खरेदी उभारणी | रू. 3,08,00,000/— |
| ब) इतर पुरक मशिनरी पुरवठा करणे | रू. 3,54,00,000/— |
| एकूण | रू. 6,62,00,000/— |

अ) याकरिता रू. रू. 6,62,00,000/— चे विशेष शासननिधी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाअधिकारी मार्फत शासनास पाठविण्यात येत आहे. तसेच शासन निधी प्राप्त न झाल्यास,
ब) सत्र 2019—2020 च्या नमुद प्रावधान व्ययपद क्र. A 42201474614 मध्ये वाढीव तरतुद रू. 6,62 कोटी एवढया राशीचा अंतर्भाव करण्याचा तसेच नविन 80 TPH बॅचमिक्स प्लॅन्ट खरेदी उभारणी व इतर पुरक मशिनरी पुरवठा करण्याबाबत ई—निविदा मागविण्यास मान्यता करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

वि.क्र.111:— {लोककर्म झोन ०८} महापालीका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास करणे योजने अंतर्गत पुर्व नागपूर विधानसभा क्षेत्रामधील प्रभाग क्र. 25, भारतीय लोककल्याण सोसायटी येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 4 निविदापैकी मे. एस. के.गुरूबक्षानी यांची प्राकलनीय राशीपेक्षा 14.85 टक्के कमी दराची रू. 41,48,416/— निम्नतम निविदा स्विकारणे व मे. एस.के.गुरूबक्षानी यांना रू. 41,48,416/— + GST 12% - रू. 4,97,810/— + Testing Charges 14,550/— एकुण रू. 46,60,776/— राशीचे कार्यादेश निर्गमीत करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप :—

1. प्रस्तुत कामास शासन निर्णय क्र. डेस्क 12/एमयुएन—3/कावि 296/प्र.मा. 45/2019 दिनांक 05.03.2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे (100 टक्के शासन निधी)
2. कामाचा खर्च पद क्र. A 42001361002 (649) मधून करण्यात येईल.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.112:— {बाजार विभाग} गांधीबाग झोन क्र. 6 अंतर्गतचे महाल बडकस चौक येथील बाजार विभागाचे सायकल/स्कुटर पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019—20 या चालु आर्थीक वर्षा करीता म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 अन्वये निश्चित केलेल्या दरानुसारखालील प्रमाणे ई—निविदा करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | वाहण प्रकार | प्रचलित दर (रू.) | पार्कींग पॉलीसी – 2016 नुसार तासी दर (रू.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (0–1) | (1–2) | (2–4) |
| 1 | सायकल / हाथठेला | 5 / – | – | – | – |
| 2 | टु–व्हिलर / स्कुटर | 10 / – | 10 / – | 20 / – | 30 / – |
| 3 | ऑटो रिक्षा | 20 / – | 10 / – | 30 / – | 40 / – |
| 4 | कार / जीप | 20 / – | 30 / – | 70 / – | 80 / – |
| 5 | बस / मिनी बस | – | 40 / – | 90 / – | 110 / – |
| 6 | ट्रक / टेम्पो | – | 50 / – | 110 / – | 140 / – |

निविदाधारकांस वरील स्टॅन्ड करीता म.न.पा. कर्मचाऱ्यांसाठी खालील प्रमाणे सायकल / स्कुटर व इतर वाहना बाबत खालील प्रमाणे दर आकारावे लागेल.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | म.न.पा. कर्मचारी मासिक पासधारक (प्रतिमाह) | प्रति सायकल | रू. 30 / – |
| | | प्रति स्कुटर | रू. 50 / – |
| ब) | म.न.पा. कर्मचारी (प्रतिदिन) | प्रति सायकल | रू. 1 / – |
| | | प्रति स्कुटर | रू. 2 / – |

बाजार विभागाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे मागील वर्षी निविदा व्दारे प्राप्त झालेल्या दर रकमेवर 10 टक्के वाढ करू रू. 6,28,000 / – मुळ निविदा रक्कम निश्चित करण्यात आली होती. तथापी म.न.पा. पार्कींग पॉलीसी – 2016 नुसार वाहन पार्कींगचे दर दिड / दोन / तिन पट वाढ होत असल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने ई–निविदे करीता मुळ निविदा रकमेच्या दुप्पट रक्कम गृहीत धरल्यास निविदा रक्कम रू. 11,42,000 / – सरासरी इतकी होईल. बाजार विभागाने पार्कींग करीता प्रस्तावित निविदा राशीसमा. आयुक्त, म.न.पा. यांनी मान्यता प्रदान केली आहे. वखालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) बडकस चौक पार्कींग प्लाझा स्टॅन्ड करीता सन 2019–20 या चालु वर्षाची निविदा रक्कम रू. 11,42,000 / – ची ई–निविदा काढणे.

2) यशस्वी निविदा धारकास पार्कींग स्टॅन्डची जागा एक वर्षाची मुदत कालावधीकरीता देण्यात येईल. उक्त पार्कींग स्टॅन्ड योग्य रित्या परिसंचालन होत आहे अशी म.न.पा.ची खात्री झाल्यास, पूढील एक–एक वर्षा करीता मुदत वाढवुन देता येईल. तथापी कोणत्याही परिस्थितीत सदर मुदत तिन वर्षा पेक्षा जास्त राहणार नाही.

3) मंजुर निविदा धारकांस कार्यादेश दिल्यानंतर मुदत वाढ देतांना व्दितीय वर्षाकरीता मंजुर निविदा रकमेच्या 10 टक्के वाढ देय राहील तसेच तृतीय वर्षाकरीता निविदा रकमेवर 20 टक्के वाढ देय राहील.

करीता उपरोक्त प्रमाणे सादर केलेले अनु क्र. 1, 2 व 3 प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.113:– {बाजार विभाग} धरमपेठझोन क्र. 2 अंतर्गतचे सुपर मार्केट येथील बाजार विभागाचे सायकल / स्कुटर पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019–20 या चालु आर्थीक वर्षा करीता म.न.पा. पार्कींग पॉलीसी – 2016 अन्वये निश्चित केलेल्या दरानुसारखालील प्रमाणे ई–निविदा करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | वाहण प्रकार | प्रचलित दर (रू.) | पार्कींग पॉलीसी – 2016 नुसार तासी दर (रू.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (0–1) | (1–2) | (2–4) |
| 1 | सायकल / हाथठेला | 2 / – | – | – | – |
| 2 | टु–व्हिलर / स्कुटर | 5 / – | 10 / – | 20 / – | 30 / – |
| 3 | ऑटो रिक्षा | 10 / – | 10 / – | 30 / – | 40 / – |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | कार / जीप | 10 / — | 30 / — | 70 / — | 80 / — |
| 5 | बस / मिनी बस | — | 40 / — | 90 / — | 110 / — |
| 6 | ट्रक / टेम्पो | — | 50 / — | 110 / — | 140 / — |

निविदाधारकांस वरील स्टॅन्ड करीता म.न.पा. कर्मचाऱ्यांसाठी खालील प्रमाणे सायकल / स्कुटर व इतर वाहना बाबत खालील प्रमाणे दर आकारावे लागेल.

अ) म.न.पा. कर्मचारी मासिक पासधारक (प्रतिमाह) — प्रति सायकल रू. 30 / —; प्रति स्कुटर रू. 50 / —

ब) म.न.पा. कर्मचारी (प्रतिदिन) — प्रति सायकल रू. 1 / —; प्रति स्कुटर रू. 2 / —

बाजार विभागाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे मागील वर्षी निविदा व्दारे प्राप्त झालेल्या दर रकमेवर 10 टक्के वाढ करू रू. 10,56,000 / — मुळ निविदा रक्कम निश्चित करण्यात आली होती. तथापी म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 नुसार वाहन पार्कींगचे दर दिड / दोन / तिन पट वाढ होत असल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने ई—निविदे करीता मुळ निविदा रकमेच्या दुप्पट रक्कम गृहीत धरल्यास निविदा रक्कम रू. 19,20,000 / — सरासरी इतकी होईल. बाजार विभागाने पार्कींग करीता प्रस्तावित निविदा राशीसमा. आयुक्त, म.न.पा. यांनी मान्यता प्रदान केली आहे. वखालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) सुपर मार्केट येथील सायकल / स्कुटर व इतर वाहन पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019—20 या चालु वर्षाची निविदा रक्कम रू. 19,20,000 / — ची ई—निविदा काढणे.

2) यशस्वी निविदा धारकास पार्कींग स्टॅन्डची जागा एक वर्षाची मुदत कालावधीकरीता देण्यात येईल. उक्त पार्कींग स्टॅन्ड योग्य रित्या परिसंचालन होत आहे अशी म.न.पा.ची खात्री झाल्यास, पूढील एक—एक वर्षा करीता मुदत वाढवुन देता येईल. तथापी कोणत्याही परिस्थितीत सदर मुदत तिन वर्षा पेक्षा जास्त राहणार नाही.

3) मंजुर निविदा धारकांस कार्यादेश दिल्यानंतर मुदत वाढ देतांना व्दितीय वर्षाकरीता मंजुर निविदा रकमेच्या 10 टक्के वाढ देय राहील तसेच तृतीय वर्षाकरीता निविदा रकमेवर 20 टक्के वाढ देय राहील.

करीता उपरोक्त प्रमाणे सादर केलेले अनु क्र. 1, 2 व 3 प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.114:— {बाजार विभाग} धंतोलीझोन क्र. 4 अंतर्गतचे न्यु. एस.टी. स्टॅन्ड समोरील शेतकरी भवना मागील बाजार विभागाचे सायकल / स्कुटर पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019—20 या चालु आर्थीक वर्षा करीता म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 अन्वये निश्चित केलेल्या दरानुसारखालील प्रमाणे ई—निविदा करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | वाहण प्रकार | प्रचलित दर (रू.) | पार्कींग पॉलीसी — 2016 नुसार तासी दर (रू.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (0—1) | (1—2) | (2—4) |
| 1 | सायकल / हाथठेला | 2 / — | — | — | — |
| 2 | टु—व्हिलर / स्कुटर | 5 / — | 10 / — | 20 / — | 30 / — |
| 3 | ऑटो रिक्षा | 10 / — | 10 / — | 30 / — | 40 / — |
| 4 | कार / जीप | 10 / — | 30 / — | 70 / — | 80 / — |
| 5 | बस / मिनी बस | 50 / — | 40 / — | 90 / — | 110 / — |
| 6 | ट्रक / टेम्पो | 50 / — | 50 / — | 110 / — | 140 / — |

निविदाधारकांस वरील स्टॅन्ड करीता म.न.पा. कर्मचाऱ्यांसाठी खालील प्रमाणे सायकल / स्कुटर व इतर वाहना बाबत खालील प्रमाणे दर आकारावे लागेल.

अ) म.न.पा. कर्मचारी मासिक पासधारक (प्रतिमाह) — प्रति सायकल रू. 30 / —; प्रति स्कुटर रू. 50 / —

ब) म.न.पा. कर्मचारी (प्रतिदिन) — प्रति सायकल रू. 1/— ; प्रति स्कुटर रू. 2/—

बाजार विभागाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे मागील वर्षी निविदा व्दारे प्राप्त झालेल्या दर रकमेवर 10 टक्के वाढ करू रू. 11,55,000/— मुळ निविदा रक्कम निश्चित करण्यात आली होती. तथापी म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 नुसार वाहन पार्कींगचे दर दिड/दोन/तिन पट वाढ होत असल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने ई—निविदे करीता मुळ निविदा रकमेच्या दुप्पट रक्कम गृहीत धरल्यास निविदा रक्कम रू. 21,00,000/— सरासरी इतकी होईल. बाजार विभागाने पार्कींग करीता प्रस्तावित निविदा राशीसमा. आयुक्त, म.न.पा. यांनी मान्यता प्रदान केली आहे. वखालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे

1) न्यु. एस.टी. स्टॅन्ड समोरील शेतकरी भवना मागील सायकल/स्कुटर व इतर वाहन पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019—20 या चालु वर्षाची निविदा रक्कम रू. 21,00,000/— ची ई—निविदा काढणे.

2) यशस्वी निविदा धारकास पार्कींग स्टॅन्डची जागा एक वर्षाची मुदत कालावधीकरीता देण्यात येईल. उक्त पार्कींग स्टॅन्ड योग्य रित्या परिसंचालन होत आहे अशी म.न.पा.ची खात्री झाल्यास, पूढील एक—एक वर्षा करीता मुदत वाढवुन देता येईल. तथापी कोणत्याही परिस्थितीत सदर मुदत तिन वर्षा पेक्षा जास्त राहणार नाही.

3) मंजुर निविदा धारकांस कार्यादेश दिल्यानंतर मुदत वाढ देतांना व्दितीय वर्षाकरीता मंजुर निविदा रकमेच्या 10 टक्के वाढ देय राहील तसेच तृतीय वर्षाकरीता निविदा रकमेवर 20 टक्के वाढ देय राहील.

करीता उपरोक्त प्रमाणे सादर केलेले अनु क्र. 1, 2 व 3 प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.115:— {बाजार विभाग}

धरमपेठझोन क्र. 2 अंतर्गतचे नेताजी मार्केट येथील बाजार विभागाचे सायकल/स्कुटर पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019—20 या चालु आर्थीक वर्षा करीता म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 अन्वये निश्चित केलेल्या दरानुसारखालील प्रमाणे ई—निविदा करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | वाहण प्रकार | प्रचलित दर (रू.) | पार्कींग पॉलीसी — 2016 नुसार तासी दर (रू.) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (0—1) | (1—2) | (2—4) |
| 1 | सायकल/हाथठेला | 2/— | — | — | — |
| 2 | टु—व्हिलर/स्कुटर | 5/— | 10/— | 20/— | 30/— |
| 3 | ऑटो रिक्षा | 10/— | 10/— | 30/— | 40/— |
| 4 | कार/जीप | 10/— | 30/— | 70/— | 80/— |
| 5 | बस/मिनी बस | — | 40/— | 90/— | 110/— |
| 6 | ट्रक/टेम्पो | — | 50/— | 110/— | 140/— |

निविदाधारकांस वरील स्टॅन्ड करीता म.न.पा. कर्मचाऱ्यांसाठी खालील प्रमाणे सायकल/स्कुटर व इतर वाहना बाबत खालील प्रमाणे दर आकारावे लागेल.

अ) म.न.पा. कर्मचारी मासिक पासधारक (प्रतिमाह) — प्रति सायकल रू. 30/— ; प्रति स्कुटर रू. 50/—

ब) म.न.पा. कर्मचारी (प्रतिदिन) — प्रति सायकल रू. 1/— ; प्रति स्कुटर रू. 2/—

बाजार विभागाचे प्रचलित पध्दतीप्रमाणे मागील वर्षी निविदा व्दारे प्राप्त झालेल्या दर रकमेवर 10 टक्के वाढ करू रू. 3,32,200/— मुळ निविदा रक्कम निश्चित करण्यात आली होती. तथापी म.न.पा. पार्कींग पॉलीसी — 2016 नुसार वाहन पार्कींगचे दर दिड/दोन/तिन पट वाढ होत असल्याचे दिसुन येते. या अनुषंगाने ई—निविदे करीता मुळ निविदा रकमेच्या दुप्पट रक्कम गृहीत धरल्यास निविदा रक्कम रू.

6,04,000/– सरासरी इतकी होईल. बाजार विभागाने पार्कींग करीता प्रस्तावित निविदा राशीसमा. आयुक्त, म.न.पा. यांनी मान्यता प्रदान केली आहे. वखालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) नेताजी मार्केट येथील सायकल/स्कुटर व इतर वाहन पार्कींग स्टॅन्ड करीता सन 2019–20 या चालु वर्षाची निविदा रक्कम रू. 6,04,000/– ची ई–निविदा काढणे.
2) यशस्वी निविदा धारकास पार्कींग स्टॅन्डची जागा एक वर्षाची मुदत कालावधीकरीता देण्यात येईल. उक्त पार्कींग स्टॅन्ड योग्य रित्या परिसंचालन होत आहे अशी म.न.पा.ची खात्री झाल्यास, पूढील एक–एक वर्षा करीता मुदत वाढवुन देता येईल. तथापी कोणत्याही परिस्थितीत सदर मुदत तिन वर्षा पेक्षा जास्त राहणार नाही.
3) मंजुर निविदा धारकांस कार्यादेश दिल्यानंतर मुदत वाढ देतांना व्दितीय वर्षाकरीता मंजुर निविदा रकमेच्या 10 टक्के वाढ देय राहील तसेच तृतीय वर्षाकरीता निविदा रकमेवर 20 टक्के वाढ देय राहील.

करीता उपरोक्त प्रमाणे सादर केलेले अनु क्र. 1, 2 व 3 प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.116:– प्रभाग क्र. ३७, लोखंडे नगर येथे आय–ब्लॉक लावणे.
{प्रकल्प विभाग} रूपये ३३५८९१३/– च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविण्यात आल्या होत्या व सदर निविदा स्थायी समिती ठराव क्र. ६५५ दि. ३०/०१/२०१९ अन्वये मंजूर करण्यात आली होती. परंतु या ठरावात Typing च्या चुकीने निविदाकार मे, विशणदास नानकराम खत्री ऐवजी मे. विशालदास नानकदास खत्री असे दर्शविण्यात आले व टक्केवारी मध्ये प्राकलनीय दरापेक्षा १८.०० टक्के ऐवजी १२.२४ टक्के असे दर्शविण्यात आले. सदर चुक दुरूस्तीचा ठराव मंजूरी विचारात घेणे, व त्याअन्वये खालील प्रमाणे सुधारीत वाक्य रचनेचा ठराव मजकुर मान्यतेचा प्रश्न विचारात घेणे.

प्रभाग क्र. ३७, लोखंडे नगर येथे आय–ब्लॉक लावणे. रूपये ३३५८९१३/– च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, विशणदास नानकराम खत्री यांची प्राकलनिय दरापेक्षा १८.०० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये २७५४३०९/– निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ३७९५५७२/– असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये २७५४३०९/– + १२ टक्के जीएसटी रूपये ३३०५१७/– असे एकुण रूपये ३०८४८२६/– ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :– १) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.117:– प्रभाग क्र. 28 अंतर्गत आराधना नगर मौजा– दिघोरी येथील
{लोककर्म झोन ०५} रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई–निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. अमृता कन्ट्रक्शन यांची १३.११% कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ३०,७५,२५६/– त्यावरील 12 टक्के जीसटी ३,६९,०३१ /– व १टक्का चाचणी शुल्क ३०,७५३/–ईत्यादी सह एकुण रू. ३४,७५,०३९/– रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप :–

१. या कामाकरीता तांत्रीक मंजुरी प्राप्त आहे.
२. सदर काम ''महानगरपालिका क्षेत्रात'' म.न.पा., नागपूर मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी शासकीय निधी अंतर्गत विशेष तरतूद या योजने अंतर्गत प्रस्तावित आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक–पूरक–२०१८/प्र.क्र.१७५(४)नवि–१६ दिनांक ०१/०२/२०१९
३. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.118ः— स्थायी समिती ठराव क्र. 280, दि. 29.11.2017 व
{समाजकल्याण विभाग} स्थायी समिती ठराव क्र. 106, दि. 21.07.2017 मधिल उपसमितीद्वारे निर्धारीत अटी व शर्तीनुसार झोन क्र 1 ते 10 अंतर्गत महिला समुपदेशन केंद्र चालविण्याकरीता स्वयंसेवी संस्थेची निवड EOI निवीदा प्रक्रीयेद्वारे पुढील दोन वर्षाच्या कालावधीकरीता करण्याचा प्रश्न विचारात घेण्याबाबत.
टिप :—सविस्तर माहिती नस्तीत संलग्न.

वि.क्र.119ः— प्रभाग क्र. ३५ अरविंद सोसायटी ते निवास पाप्युलर
{प्रकल्प विभाग} सोसायटी शिल्पा सोसायटी ख.क्र. ७५,७१,७२,७६,७८, लघुवेतन सोसायटी, साईकृपा सोसा. व गुरूदत्त सोसायटी येथे, रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता रूपये ११५४३३६५/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविण्यात आल्या होत्या व सदर निविदा स्थायी समिती ठराव क्र. ६६८ दि. ३०/०१/२०१९ अन्वये मंजूर करण्यात आली होती. परंतु या ठरावात Typing च्या चुकीने एकुण रक्कम रू. १२४२४३५३/— ऐवजी रू. ११२२६२९१/— दर्शविण्यात आली सदर चुक दुरूस्तीचा ठराव मंजूरी विचारात घेणे व त्याअन्वये खालील प्रमाणे सुधारीत वाक्य रचनेचा ठराव मजकुर मान्यतेचा प्रश्न विचारात घेणे.

प्रभाग क्र. ३५ अरविंद सोसा., ते निवास पाप्युलर सोसा., शिल्पा सोसा. ख.क्र. ७५,७१,७२,७६,७८, लघुवेतन सोसायटी, साईकृपा सोसा. व गुरूदत्त सोसायटी येथे, रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाकरीता रूपये ११५४३३६५/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. फोनिक्स इंजिनिअरिंग यांची प्राकलनिय दरापेक्षा ३.९० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ११०९३१७३/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रूपये १३०४४००३/— असुन या कामावर निविदाकारांचा देकार रूपये ११०९३१७३/— १२ टक्के जी.एस.टी.(G.S.T.)रूपये १३३११८०/— असे एकुण रूपये १२४२४३५३/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.
टिप : १) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.120ः— प्रभाग क्र. ३७, महावीर प्लाय ते पडोळे चौकपर्यंत
{प्रकल्प विभाग} गडरलाईन टाकणे. रूपये ३२९५५०७/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविण्यात आल्या होत्या व सदर निविदा स्थायी समिती ठराव क्र. ६५४ दि. ३०/०१/२०१९ अन्वये मंजूर करण्यात आली होती. परंतु या ठरावात Typing च्या चुकीने प्र. मा. रक्कम रू. ३७२३९२७/— ऐवजी रू. ३६२३९२३/— दर्शविण्यात आली सदर चुक दुरूस्तीचा ठराव मंजूरी विचारात घेणे, व त्याअन्वये खालील प्रमाणे सुधारीत वाक्य रचनेचा ठराव मजकुर मान्यतेचा प्रश्न विचारात घेणे.

प्रभाग क्र. ३७, महावीर प्लाय ते पडोळे चौकपर्यंत गडरलाईन टाकणे. रूपये ३२९५५०७/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, विशणदास नानकराम खत्री यांची प्राकलनिय दरापेक्षा ८.५० टक्के प्रमाणे कमी दराची रूपये ३०१५३८८/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ३७२३९२३/— असुन या कामावर निविदाकाराचा देकाररूपये ३०१५३८८/— + १२ टक्के जीएसटी रूपये ३६१८४६/— असे एकुण रूपये ३३७७२३४/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.
टिप :— १) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.121ः— नागपूर महानगरपालिकेला शासन निर्णय क्रमांक मनपा
{वित्त विभाग} 2018/प्र.क्र 154/नवि 16 दिनांक 08 मार्च 2019 अन्वये विशेष सहाय्यक अनुदानाचा रू 150 कोटी इतका दुसरा हप्ता प्राप्त झाला आहे. सदर अनुदान विनियोगाचे अधिकार शासनाने शासन निर्णय क्र. मनपा 2018/प्र.क्र.154/नवि 16 दिनांक 29 ऑक्टोंबर 2018 अन्वये महानगरपालिकेच्या स्थायी समितीस प्रदान केले आहेत.

सद्यःस्थितीत महानगरपालिकेचा एकूण मासिक बांधील खर्च अंदाजे रू 122.60 कोटी आहे त्यामध्ये प्रामुख्याने वेतन, सेवानिवृत्ती वेतन, पेट्रोल/डिझेल, दुरध्वनी, विद्युत देयके, कच्चे पाणी देयके, कनक, भांडेवाडी, OCW OTS, सिमेंट रस्ते प्रकल्प, हुडकेश्वर नरसाळा, व इतर भांडवली प्रकल्पा वरील खर्च, सुरक्षा गार्ड, कॉम्प्यूटर ऑपरेटर खर्च, वाहन पुरवठा, शासकीय प्रदाने, कर्ज परतफेड, इत्यादींचा समावेश आहे.

वर नमूद वस्तूस्थिती विचारात घेता मनपाला शासनाकडून दरमहा प्राप्त होणारे सहाय्यक अनुदान व मनपाचे स्व उत्पन्न हे पूर्णतः या बांधील खर्चावर खर्च होत आहे. व परिणामी मनपा निधीतून झालेल्या कामांची देयके मनपाला प्रदान करणे शक्य होत नाही.

यापैकी घनकचरा वाहतुक प्रकल्प, भांडेवाडी मलःनिसारण प्रकल्प, परिवहन उपक्रमासाठी दरमहा करावा लागणारा खर्च, मनपाला दर महा वहन करावा लागणारा विद्युत खर्च, नवीनLED lightप्रकल्पाची देणी, मनपाला कच्चे पाणी खरेदीसाठी लागणारा खर्च, या मुख्य भांडवली व अन्य स्वरूपाच्या कामांसाठी दर महा अंदाजे 30.35 कोटी रू खर्च लागत आहे.

मनपाची आर्थिक सद्यःस्थिती पाहता जानेवारी 2019 ते मे 2019 या कालावधीची कंत्राटदारांची मनपा निधीतील अंदाजे 80 ते 90 कोटी रकमेची देयके प्रदान करणे प्रलंबित आहे कंत्राटदारांची देयके विहित मुदतीत अदा केली जात नसल्याने कंत्राटदार पुन्हा आंदोलनाच्या तयारीत आहेत. व यापुढील कामावंरही या बाबीचा प्रभाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही मनपाचे स्व उत्पन्न स्त्रोंत पाहता व मासिक बांधील खर्च व प्राप्त अनुदान/उत्पन्न यांचा ताळमेळ पाहता अजून किमान 6 ते 8 महिने कालावधीपर्यंत ही प्रलंबित देयके प्रदान करणे मनपाला शक्य नाही यामुळे कंत्राटदारांचा उद्रेक होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

सदर बाब पाहता वर उल्लेखित यापूढे उद्भवणारा दर महा अंदाजे 30.35 कोटी रू खर्च प्राप्त विशेष अनुदानातून भागविल्यास होणाऱ्या बचतीतून मनपाच्या कंत्राटदारांची जानेवारी 2019 ते मे 2019 या कालावधीची प्रलंबित देयके पुढील 2 महिन्यात भागविण्यात येणे शक्य आहे.

सदर 150 कोटी रू विशेष सहाय्यक अनुदानाच्या विनियोगाबाबत मा. स्थायी समितीस शासनाने अधिकार प्रदान केले असल्याने विशेष सहाय्यक अनुदानाच्या रू 150 कोटी या दुसऱ्या हप्त्याच्या विनियोगाबाबत योग्य तो निर्णय घेण्यासाठी मा. स्थायी समिती समोर सादर.

वि.क्र.122ः— नागपूर महानगरपालिका व असोसिएशन ऑफ रिसर्च ॲण्ड
{शिक्षण विभाग} ट्रेनिंग एन बेसिक सायंस एज्युकेशन नागपूर यांचे संयूक्त विद्यमानाने दिनांक 28.11.2018 ते दि. 02.12.2018 या कालावधीत अपूर्व विज्ञान मेळावा घेण्यात आला. मेळाव्याच्या आयोजनाकरिता लागलेल्या खर्चाची देयके रूपये 9 लाख 56 हजार 530 ची देयके संस्थेने सादर केलेली आहेत. एकुण खर्चापैकी रूपये 5 लक्ष सहयोग राशी संस्थेस देण्याबाबत वित्तीय व प्रशासकिय मंजूरी प्राप्त झाली होती. प्रस्तूत सहयोग राशी देय करण्यास्तव वित्त विभागास प्रस्ताव सादर केला असता. मा. प्र.ले.वि. अ. यांनी संस्थेला थेट प्रदानासाठी स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. असे नमुद केले आहे. या अनुषंगाने सादर करण्यात येते की अपूर्व विज्ञान मेळावा दरवर्षी प्रस्तूत संस्थेच्या माध्यमातून आयोजित करण्यात येतो शै. सत्र 2018—19 मध्ये मेळाव्याच्या आयोजनाकरिता मा. स्थायी समिती सभापती यांनी पत्र क्र. 774/PR/CSC/Provision अन्वये अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित करण्याबाबत, यास्तव, रूपये 5 लक्ष राशी मुक्त करून सहयोग राशी रूपये 5 लक्ष अग्रीम धनादेशाद्वारा देण्याबाबत सूचित केलेले होते.

आयोजनापुर्वी वित्तीय व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असल्यामुळे व त्यावेळी स्थायी समितीच्या मान्यतेच्या आवश्यकतेबाबत नमुद नसल्यामुळे स्थायी समितीची कार्यक्रमापुर्वी मान्यता घेतलेली नव्हती. परंतू मा. प्र.ले.वि.अ. यांचे अभिप्राय अन्वये स्थायी समितीची मंजूरीची आवश्यकता असल्यास कार्योत्तर परवानगी घ्यावी लागेल. अपूर्व विज्ञान मेळाव्याच्या विविध बाबींवर झालेली खर्चाचा तपशील

नस्तीत नमुद आहे. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबाबत फोटोग्राफ्स सोबत संलग्न केलेले आहेत. अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन यशस्वी पणे केल्यामुळे सहयोगी संस्था असोसिएशन ऑफ रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग एन बेसिक सायंस एज्युकेशन नागपूर यांना रूपये 5 लक्ष सहयोग राशी महानगर पालिकेतर्फे प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. करीता सादर प्रस्तुत.

वि.क्र.123ः— {लोककर्म झोन 4} प्रभाग क्र. ३३ (ब) अंतर्गत मित्र नगर येथील रस्त्याचे सिमेंटीकरण करणे. रूपये 2543574/- च्या निविदा राशीचे शासनाच्या निधी अंतर्गत महानगर पालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता,प्राप्त निविदा पैकी निम्नतमनिविदाकार मे. Dixant Gajbhiye यांची प्राकलनीय दरापेक्षा 3.56 टक्के कमी दराची रूपये 2453023/- ची निवीदा प्राप्त झाली. या कामावर निविदाकाराचा प्राकलनीय राशीच्या 3.56 टक्के कमी दराचा देकार रूपये 2453023/- +१२ टक्के जीएसटी रूपये 294363/- व टेस्टींग चार्जेस रूपये 24530/- असे एकूण रूपये 2771916/-ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :-

१) सदर काम " महानगर पालिका क्षेत्रात" म.न.पा. नागपूर मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी प्रस्तावित आहे.

२) सदर काम म.न.पा. आय व्यय पद क्र. महानगर पालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजने अंतर्गतच्या निधी मधून प्रस्तावित आहे

३) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.124ः— {पेंच प्रकल्प कक्ष} फुले मार्केट परिसरामध्ये शॉपींग मॉल बांधण्याचे काम मे. शांती कन्स्ट्रक्शन यांना 31.08.2006 ला देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे कामाची किंमत रु. 9,99,43,501/- ऐवढी होती. काम सुरु करता वेळी स्थानिक दुकानदारांचा विरोध बसल्याने कंत्राटदाराने काम बंद केले व निविदेच्या अटीप्रमाणे मध्यस्थ (Arbitrator) नेमणूक करण्याकरिता मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे अर्ज सादर केले असता खंडपीठाने न्यायमूर्ती श्री. महाजन (निवृत्त) व तद्नंतर न्यायमूर्ती श्री. एस. आर. डोनगावकर (निवृत्त) यांची मध्यस्थ (Arbitrator) म्हणून नेमणूक केलेली आहे. सर्व बाबींची शहानिशा करुन मा. न्यायमूर्ती श्री. एस.आर. डोनगावकर (निवृत्त) यांनी दि. 24.02.2018 ला पारीत केलेल्या आदेशान्वये मे. शांती कन्स्ट्रक्शन हे रु. 42,95,549/- चे हकदार आहेत. याबाबतमनपाचे अभिक्कता ॲड. ए.एम. काझी यांनी दि. 01.012.2018 ला दिलेल्या पत्रान्वये हा क्लेम सेटल करुन प्रकरण निकाली काढावे असे मत दिले. त्यांनुषंगाने मे. शांती कन्स्ट्रक्शन याना रु. 42,95,549/- चे देयक प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

वि.क्र.125ः— {लोककर्म झोन 7} प्रभाग क्र. ५ अंतर्गत दिनेश जनरल स्टोर्स ते दुर्गा मंदिर राणी दुर्गावती चौक येथे रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याच्या रु. ३२,८२,६७३/— च्या कामाकरिता निम्नतम कंत्राटदार मे. जी.बी. कन्स्ट्रक्शन यांच्या २.६०% कमी दरावरील निविदेस स्थायी समिती ठराव क्र. ६ दि. ०८/०३/२०१९ अन्वये मंजूरी प्राप्त असून दि. १०/०३/२०१९ रोजी लागू झालेल्या लोकसभा निवडणूकीच्या आचार संहितेमुळे पुढील कार्यादेश प्रक्रीया करण्यास प्रतिबंध राहिल्याने व आचारसंहिता काळातच दि. २९/०४/२०१९ ला ७५ दिवसाचा निविदा दर वैधता कालावधी संपुष्टात आला असल्याने आणि त्या आधारे कंत्राटदाराने मंजूर निविदा दरावर काम करण्यास अनिच्छा प्रदर्शीत केल्यामुळे सदर निविदा रद्द करून नव्याने निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता देण्याचा तसेच सदर कामाकरिता वर्ष २०१९—२० च्या अर्थसंकल्पातून तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) कंत्राटदारा मे. जी.बी. कन्स्ट्रक्शन यांचे पत्र क्र. ६६३दि. १९/०४/२०१९ नस्तीत संलग्न आहे.
२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.126:— प्रभाग क्र.२४—क मधील ढोबळे ले आऊट येथील
{लोककर्म झोन ०८} सिमेंट रस्ते बांधकामाकरिता स्थायी समिती ठराव क्र. ७५३ दिनांक १४.०२.२०१९ अन्वये रू. २८,००,०८२/—रकमेचे कार्यादेश मे. उल्हास एंटरप्रायजेस यांना निर्गमित करण्यात आले आहे मात्र प्रस्तुत ठिकाणी नागपूर सुधार प्रन्यास मार्फत काम सुरू करण्यात आल्याने, प्रभागाच्या मा. नगरसेविका यांनी सूचविल्याप्रमाणे त्याच अभिन्यासात इतर रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे/ मौका बदल करणे तसेच या कामाकरिता पद क्र. ए ४०२००४७०२०२ मधून सन २०१९—२० चे अंदाजपत्रकातून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१. प्रस्तुत कामास स्थायी समिती ठराव क्र. ४७९ दिनांक ०९.०२.२०१८ अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त असून, सन २०१७—१८ मध्ये प्रावधान उपलब्ध करून देण्यात आले आहे.
२. प्रस्तुत कामाचे निविदेस स्थायी समिती ठराव क्र. ७५३ दिनांक १४.०२.१९ अन्वये मंजुरी प्राप्त आहे.
३. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.127:— प्रभाग क्र. ५ ड अंतर्गत मेहेंदीबाग रोड रेल्वे क्रॉसींग ते कांजी हाऊस
{लोककर्म झोन 7} चौक ते विटा भट्टी चौक येथे सिव्हर लाईन टाकणे. (चरण –I. विटाभट्टी चौक ते कांजी हाऊस) या प्रशासकीय मान्यता प्राप्त रु. २,३४,९५,७०४/— च्या व निविदा राशी रु. ८९,१८,४४९/— च्या कामा करिता प्राप्त दोन पात्र निविदां पैकी मे. उल्हास एन्टरप्रायझेस यांच्या प्राकलनीय दरापेक्षा १०% अधिक असलेल्या निविदेच्या वाटाघाटी नंतर ४% अधिक दरावरील रु. ९२,७५,१८६/— किंमती चे काम +१२% (११,१३,०२२/—) जीएसटी + १% (९२७५१/—) चाचणीशुल्क यासह एकूण १,०४,८०,९५९/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करणे तसेच सदर कामाकरिता वर्ष २०१९—२० च्या अर्थसंकल्पातून कार्यराशीची तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६१९(A४३९०१३७१९१३)अंतर्गत प्रस्तावित असुन रु. २,३४,९५,७०४/— प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.
२) सभापती स्थास यांना याकामाकरिता रु. १,०४,८०,९५९/— या कार्यराशीची वर्ष २०१९—२० च्या अर्थसंकल्पातून तरतूद उपलब्ध करण्याची विनंती आहे.
३) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

वि.क्र.128:— नागपूर शहरातील डांबरी रस्त्यावरील खड्डयाची दूरुस्ती नविन
{हॉट मिक्स प्लॅन्ट} Technology असलेली Road Instta Patcher Machine द्वारे करण्याच्या कामाकरीता रु. 1,99,76,600/— (रू. एक कोटी नव्यानव लक्ष छयात्तर हजार सहाशे ) राशीचे प्राकलनास पद क्र. A220014330805 अंतर्गत प्रावधान मुक्त करून प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा व कामास्तव नियमित ई – निविदा बोलविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1) या कामास्तव रु. 1,78,36,250/— रक्कमेला मा. मूख्य अभियंता यांनी तांत्रीक मान्यता क्र. CE/PWD/T.S./327/2018-19, दि. 08.05.2019 अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केली आहे.
2) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

———————